म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : काव्य
दा. क्र. : १८२२

IRBK-0101922
IRBK-0101922

१८२२
१५।१।८६

# पक्ष्याणी

म. सं. सा. संघ, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
ग्रा. क्र. १८२२ दिनांक १२।१।८६
विषय गोष्टी क्र..........

# पक्याची गँग

गंगाधर
गाडगीळ

IRBK-0101922
IRBK-0101922

सुपर्ण प्रकाशन,
पुणे

प्रकाशक
सौ. सुनिता मिरासदार
१५५२ चिमणबाग
सदाशिव, पुणे ४११०३०

मुद्रक
रवी बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४, बुधवार, पुणे ४११००२

© गंगाधर गाडगीळ
४ अभंग, साहित्य सहवास
वांद्रे (पू.) मुंबई ४०० ०५१

मुखपृष्ठ
वंदन नगरकर

प्रथमावृत्ती
डिसेंबर १९८५

किंमत
रुपये नऊ

ी. आणि त्यामुळे त्याचा गरगरीत वाटोळा चेहरा भोपळ्या-
रखा लंबवर्तुळाकार दिसू लागला.

'ह्या फॅटीनं वैताग आणला बुवा. एवढे डबे भरभरून
णले होते ते खलास करून टाकले. आणि आता पुन्हा
री करतोय. पक्या, सांगून ठेवतोय मी तुला की आता
हून डबे आले तर ह्या फॅटीचं तोंड आपण बांधून ठेवा-
. फक्त दिवसातून चारदा सोडायचं. दोनदा चहा प्यायला
णि दोनदा जेवायला.' बिट्टूने सात्त्विक संताप व्यक्त
ा.

'कमाल आहे. माझं अंग एवढं मोठं आहे! एवढ्या मोठ्या
ाची काळजी घ्यायची म्हणजे खूप खाणं हे लागणारच. तू
लेका बिट्टया एवढासा आहेस. तुला कशाला खायला हवं?'
फॅटीने आपली बाजू मांडली. आणि बिट्टूला ती पटावी म्हणून
त्याला धरून गदगदा हलवले.

काउबॉयने पुढे होऊन दोघांना एकमेकांपासून दूर ढकलले.
मग तो पक्या-डे वळून म्हणाला, 'पक्या, यार, काही तरी
आयडिया काढ ना! साला गँगचा लीडर म्हणवतोस आणि
आय‌ाया काढत नाही, म्हणजे काय?'

'साला, लीडरच्याविरुद्ध बोलतोस?' पक्याने एकदम
धावत जाऊन काउबॉयच्या हनुवटीवर ठोसा लगावल्यासारखे
केले. मग त्याने आपले डोके कराकरा खाजवले. हेतू हा की
डोक्यातली एखादी चांगलीशी आयडिया बाहेर यावी!

फॅटी म्हणाला, 'आपण डोंगरावर जाऊन करवंदं खाऊया
णि जमलं तर थोडेसे काजू.'

हॅट! आपण सकाळीच चिकार करवंदं खाल्ली. हा फॅटी

म्हणजे वैताग आहे नुसता. त्याला खाण्याशिवाय दुसरं काही सुचतच नाही.' बिट्टूने फॅटीची आयडिया कटाप केली.

'त्यापेक्षा सशाची शिकार करूया का?' काउबॉयने आपली आयडिया बाहेर काढली.

'साला, सशाइतका फास्ट धावणार कोण? काय फॅटी धावणार आहे?' बिट्टूने पुन्हा फॅटीची कळ काढली.

आता मात्र फॅटी चिडला आणि बिट्टूच्या अंगावर धावून गेला. काउबॉयने त्याला अडवले आणि मग तो म्हणाला, 'फॅटी कशाला? आपला खंड्या आहे ना? धनगरी कुत्रं आहे ते.'

'हॅट! तो खंड्या लेकाचा इडियट आहे. तो कसली शिकार करणार? तो एवढ्या मोठ्याने भुंकेल की सगळे ससे आधीच कुठल्या कुठं पळून जातील.'

बिट्टूने खंड्याच्या गळ्याभोवती हात घातला आणि तो म्हणाला, 'नाही यार. खंड्या तो बडा होशियार कुत्तां है! होय ना रे, खंड्या?'

खंड्याने कान टवकारून त्याचे बोलणे ऐकले आणि मग तो मोठमोठ्याने भुंकत अंगणात इकडून तिकडे धावला.

'पाहिलंस, मी सांगितलं नाही तो इडियट आहे म्हणून.' फॅटी मोठमोठ्याने हसू लागला.

पक्याने एक हात वर करून सगळ्यांची गडबड बंद केली आणि तो म्हणाला, 'आपण समुद्रावर जाऊ या आणि तिथे फिरून येऊ या.'

'आयडिया!' बिट्टूने एक छोटासा डान्स केला.

'पण आपल्याला होडी देणार कोण?' फॅटीने तळहाता-

वर मूठ आपटून प्रश्न उपस्थित केला.

'हा फॅटी होडीत बसणार असला ना ...'

पक्याने बिट्टूला टपली मारून थांबवले आणि तो म्हणाला, 'बुध्या कोळ्याचा मुलगा हिऱ्या आहे ना, तो माझा दोस्त आहे. तो आपल्याला होडीतून फिरवून आणील.'

आणि मग सगळी गँग तयारी करून निघाली. पक्याच्या डोक्यावर एक टोपली हॅटसारखी घातलेली होती. मासे पकडले तर ते ठेवण्यासाठी त्याने ती बरोबर घेतली होती. काउबॉयने दोरीचे वेटोळे आपल्या कमरेला लटकावले होते. फॅटीच्या खांद्यावर त्याचा गट्टू तोल सावरून बसला होता. बिट्टूने आपली सायकल बरोबर घेतली होती. त्या सायकलच्या मागच्या बाजूला बांधलेल्या पिशवीत स्क्रूड्रायव्हर, पान्हे, किल्ल्यांचा एक प्रचंड जुडगा, चाकू वगैरे नाना आयुधे होती. खंड्याजवळ शेपटीशिवाय काहीच नव्हते ! ती मोठ्या रुबाबात हलवीत तो चालला होता. मध्येच तो रस्त्यात बसकण मारी आणि अंगाचे वेटोळे करून त्या शेपटीला चावे घेई. मग ती उभारून तो चालू लागे.

गँग रमतगमत चालली. कोणी डबक्यातल्या बेडकाची दगड मारून शिकार करीत होता, तर कोणी झाडावर चढून त्याच्या फांद्यावरून रस्त्यातल्या लोकांच्याबरोबर चालला होता. फॅटी अर्थात झाडावर काही खाण्यासारखे आहे का ते पाहात होता.

या गडबडीत बिट्टूने झाडावरून उडी मारली आणि त्याच वेळेला एक जीप भरधाव आली. बिट्टूने चटकन आपले अंग एका बाजूला झोकून दिले म्हणून; नाहीतर ती

त्याच्या अंगावरूनच गेली असती.

फॅटीच्या खांद्यावर बसलेला गुट्टू भेदरून उडाला. खंड्या 'क्यांक' करून बाजूला झाला आणि मग पुढे येऊन जोरजोरात भुंकू लागला.

'काय हैवान लोक आहेत. मी मेलो असतो ठार.' बिट्टू स्वत:चे अंग चाचपून पाहात म्हणाला.

पक्या म्हणाला, 'फॅटी, जीपचा नंबर लिहून घे. एम्आर्एफ् २०७५. पुन्हा ती दिसली तर अडवू या आपण.'

फॅटीने ताबडतोब खिशातली डायरी काढली आणि नंबर टिपून घेतला.

'कोण होते रे, जीपमध्ये?' बिट्टूने विचारले.

'दोन माणसं मला दिसली. त्यातला एक गोरा साहेब होता.' पक्याची नजर दिसेल ते अचूक टिपणारी होती.

'मलाही तो साहेब दिसला. हा लेकाचा गोरा साहेब इकडे कोकणात कशाला आला कोण जाणे. की अजून आपलंच राज्य इकडे आहे असं त्याला वाटतंय?' काउबॉयने कॉमेंट केली.

'दुसरा माणूस मात्र तद्दन स्वदेशी वाटला.' पक्याने आणखी माहिती सांगितली.

'खरं म्हणजे, कुठेतरी पाहिल्यासारखा वाटला.' फॅटीनेही आपल्या आठवणींची पोतडी उघडली.

'कुठं? मुंबईत, की इथं, या गावात?' पक्याने उलटतपासणी सुरू केली.

'काही सांगता येत नाही बुवा.' फॅटीने डोके खाजवीत म्हटले.

' ते लेकाचे गेले. आता कशाला उगीच चौकश्या ? चला, आपण जाऊ या. ' काऊबॉय म्हणाला, आणि लांब पावले टाकीत चालू लागला.

' पण ते जाऊन जाणार कुठं ? ह्या बाजूला तर किनारा आहे. तेव्हा ते किनाऱ्यावरच कुठं तरी असणार. ' पक्याच्या डोक्यात कसले तरी चक्र फिरत होते.

ते जरा पुढे गेले तेव्हा त्यांना रस्त्यात एक कुत्रा मरून पडलेला आढळला. त्याच्या अंगावरून त्या जीपचे चाक गेलेले स्पष्ट दिसत होते,

त्या कुत्र्याची ती अवस्था पाहून ते सगळेच जागच्याजागी थबकले. बिट्टूने तर चक्क डोळे झाकून घेतले ! खंड्या पाय घाशीत मागे सरकला आणि त्याने रडण्याचा सूर काढला.

' काय हलकट लोक आहेत. ' फॅटी चिडून म्हणाला.

' साल्यांना शूट केलं पाहिजे !' काउबॉय गुरगुरला.

' हे एवढ्या घाईनं निघाले होते कुठं ? काय एवढं ह्यांचं काम होतं ?' पक्या अर्धवट स्वत:शीच बोलत होता.

' काहीतरी भानगड दिसते आहे. ' बिट्टूने निष्कर्ष काढला.

' चला, आपण ती जीप कुठे गेली तेच बघू या. '

पक्याने निर्णय घेतला आणि तो तरातरा चालू लागला.

भराभर चालत ते किनाऱ्यावर जाऊन पोचले. पण जीपचा कोठेच पत्ता नव्हता. मात्र जीपच्या टायरच्या ठश्यावरून ती उजवीकडे वळली, एवढे कळत होते.

किनाऱ्यावर, डावीकडे लांबचलांब रेतीचा पट्टा होता. तेथे कोळ्यांची वस्ती होती आणि तिच्यासमोरच गलबते, होड्या वगैरे होत्या. काही होड्या किनाऱ्यावर वाळूत ओढून ठेव-

लेल्या होत्या. आणि काही समुद्रात नांगरून ठेवलेल्या होत्या. उजव्या बाजूचा किनारा मात्र खडकाळ होता आणि त्याच्या कडेला दाट झाडी होती. थोड्या अंतरावर एक छोटीशी टेकडी होती त्यामुळे पलीकडचे काहीच दिसत नव्हते. या उजव्या बाजूला होड्या नव्हत्या आणि वस्तीही नव्हती.

'चला रे, आपण या टायरच्या ठशांच्या मागोमाग जाऊ या.' आणि पक्या चालू लागला. सगळी गँग अर्थात त्याच्या मागोमाग निघाली.

पण थोड्या वेळाने त्या खडकाळ जमिनीवर टायरचे ठसे दिसेनासे झाले. तेव्हा काय करावे तेच त्यांना कळेना.

बिट्टू म्हणाला, 'इथे नीटसा रस्ता नाही. तेव्हा जीप रस्त्यावरून गेलेलीच नाही. मग ती गेली कुठं ते कळणार कसं?'

पक्याने डोके खाजवले आणि मग नखे चावीत तो म्हणाला,

'टेकडीच्या ह्या बाजूला ती नाही तेव्हा ती पलीकडच्या बाजूला असेल, नाहीतर किनाऱ्याच्या बाजूच्या झाडीत असेल.'

'जाऊ दे रे पक्या, काय उगीच डोक्याला कटकट.' फॅटीला या पाठलागाचा कंटाळा येऊ लागला होता. याचे मुख्य कारण म्हणजे त्याच्या खिशातले कुरमुरे संपले होते.

तेवढ्यात बिट्टूच्या तीक्ष्ण नजरेला काहीतरी दिसले आणि ते चटकन् उचलत तो पक्याला म्हणाला, 'पक्या, हे बघ काय ते?'

त्याने एक छोटी काळी डायरी पक्याच्या हातात दिली. पक्याने ती चाळली. त्या डायरीत निरनिराळ्या नोंदी केलेल्या

होत्या. पौंड आणि डॉलरमधल्या मोठमोठ्या रकमा लिहिलेल्या होत्या आणि अरब देशातल्या शहरांची नावे होती. शेवटी नाव होते कुवेटचे. त्याच्यापुढे काही तरी आकडा लिहिलेला होता.

सगळेजण त्याच्या भोवती जमून त्या डायरीत बघू लागले.

पक्या म्हणाला 'ही डायरी त्या साहेबाचीच असावी. साहेब चांगला पैसेवाला दिसतोय! चला हा साहेब कोण आहे ते आपण पाहायलाच हवं.'

बिट्टू म्हणाला, 'मी सायकलवरून पुढे होतो आणि त्या टेकडीच्या पलीकडे ती जीप आहे का ते पहातो. तुम्ही त्या पलीकडच्या झाडीत बघा आणि मग आपण इथेच भेटू.'

पक्या म्हणाला, 'शिट्टी आहे ना तुझ्या खिशात? तुला जीप दिसली तर तू शिट्टी वाजव आणि आम्हाला दिसली तर आम्ही वाजवू.' आणि त्याने शिट्टी वाजवूनही दाखवली.

बिट्टू सायकलवर स्वार झाला आणि त्या खडबडीत जमिनीवरून सफाईने सायकल चालवू लागला.

पक्याची शिट्टी हिऱ्याला ऐकू गेली आणि आपल्या दोस्तांना भेटण्यासाठी तो धावत निघाला. पक्याने त्याला हात केला. आणि तो आपल्या गँगबरोबर त्या झाडीच्या दिशेने चालू लागला. तिथे पोहचल्यावर त्यांना असे आढळून आले की ती झाडी फार दाट होती आणि तेथे जीप वगैरे नेणे काही शक्य नव्हते. म्हणून जरा इकडे तिकडे पाहून ते परत फिरले. तेवढ्यात हिऱ्या तेथे येऊन पोचला.

'काय दोस्त!' पक्याने हिऱ्याच्या पाठीवर थाप मारली.

हिऱ्या आपले पांढरे शुभ्र दात दाखवीत हसला आणि

म्हणाला.

'होडी काढून मासळी मारू या काय ? पण गळाला मासा लागल्यावर गळ सोडायचा नाही हा.'

तो शाळेत जात असल्यामुळे ह्या मुलांशी शहरी भाषेत बोलत असे.

पक्या म्हणाला, 'अरे बघ तरी कसे मासे पकडतो ते आज. पण बिट्टू त्या टेकडीच्या पलीकडे गेला आहे. त्याला घेऊन येऊ या आधी.'

हिऱ्याने एकदम तोंडावर हात ठेवला. 'अरे बापरे! थंय भूत असा. तिकडे गेलं म्हणजे दगड येतात अंगावर.'

पक्या एकदम तरातरा चालायला लागला. 'चला, चला. बिट्टू तिकडे एकटाच आहे.'

हिऱ्या म्हणाला, 'अरे, पण भूत!'

'मग छानच आहे की–मला नाहीतरी भूत पाहायचंच आहे.' पक्या हसला आणि जमिनीवर पडलेल्या झाडाच्या फांदीचा वेडावाकडा सोटा हातात घेऊन चालू लागला. तेव्हा बाकीचे सगळे मुकाट्याने त्याच्यामागून चालू लागले. टेकडीला वळसा घालून ते पुढे गेले तेव्हा त्यांना असे आढळून आले की, त्या बाजूला झाडी अगदी समुद्राला जाऊन भिडलेली होती. ते आणखी थोडे पुढे गेले तेव्हा शिट्टी ऐकू आली आणि मग बिट्टू सायकलवरून वेगाने परत येताना त्यांना दिसला. तो जवळ आला तेव्हा त्याच्या कपाळातून रक्त वाहत असल्याचे दिसले.

'बघ मी सांगला नाय ?' हिऱ्या ओरडला.

बिट्टू येऊन पोचला तेव्हा पक्याने पुढे होऊन रुमालाने

त्याची जखम पुसली आणि त्याच रुमालाने घट्ट बांधली.

हे काम चालले असताना त्याने बिट्टूला विचारले, ' काय रे, काय झालं ?'

बिट्टू म्हणाला, ' मी इकडे किनाऱ्याजवळ गेलो तेव्हा एकदम कोणीतरी विचित्र आवाज काढायला लागला आणि दगडाचा मारा सुरू झाला. त्यातला एक मला लागला. तेव्हा मी परत फिरलो. '

' भूत ते भूत !' हिऱ्या ठासून म्हणाला.

' होयरे बिट्टू ? भूत होतं ? तू पाहिलंस ?' पक्याने विचारले.

' नाही बुवा. भूत बीत काही मला दिसलं नाही. पण एका झाडावर एकदम आग लागली. '

' बाप रे !' हिऱ्या ओरडला.

' घाबरलास काय रे बिट्टू !' पक्याने विचारले.

' हो. एकटा होतो, म्हणून घाबरलो. पण आपण सगळं असलो तर नाही घाबरणार. ' बिट्टूला आता पुन्हा अवसान आले होते.

पक्याने थोडा वेळ विचार केला आणि मग तो म्हणाला,

' मला तर बुवा हे भूत एकदा पहावं असं वाटतं आहे. गँग काय म्हणते ?'

काउबॉयने एका दगडाला लाथ मारली. ' चलो यार. त्या भुताची ऐशी तैशी. उसको सीधा करेंगे. '

फॅटीनेही आपली जीन वर खेचली आणि खालचा ओठ पुढे काढला.

' मग ठरलं तर. आपण जायचं. फॅटी तू, बिट्टू आणि

हिऱ्या ... येणार ना रे तू हिऱ्या ? का घाबरलास भुताला ?' पक्याने विचारले.

' तुम्ही जाणार असलात तर मी पण येणार–आणि माझ्या गळच्यात ताईत आहे देवीचा. त्याच्यापुढे भुताचं काही चालायचं नाही. ' हिऱ्याने आपला भला मोठा चांदीचा ताईत सर्वांना दाखवला.

' मग असं करा, तुम्ही तिघे समोरून जा आणि भूत दगड मारायला लागलं की, तुम्ही पण त्याच्यावर दगडाचा मारा करा. मात्र काळजी घ्या हां. उगीच दगड–बिगड लागायला देऊ नका. झाडाच्या आडोशाला उभे रहा. मी आणि काउबॉय–असे ह्या बाजूनं झाडीतून त्या भुताच्या मागल्या बाजूला जातो. आणि मग दोन्हीकडून करू त्याच्यावर हल्ला. ' पक्याने आपला प्लॅन सगळ्यांना समजावून सांगितला आणि मग तो आणि काउबॉय लपत छपत वळसा घेऊन निघाले. खंड्यादेखील त्यांच्याबरोबर निघाला.

ते जाऊन थोडा वेळ झाल्यावर फॅटी, बिट्टू आणि हिऱ्या समोरून त्या झाडीजवळ गेले तेव्हा पुन्हा दगडांचा मारा सुरू झाला. मग एका बाजूला जाळ भडकला. मग दुसऱ्या बाजूला. मग तिसऱ्या बाजूला.

त्या प्रकारने ते तिघे चांगलेच घाबरले. बिट्टूने फॅटीचा दंड घट्ट पकडून ठेवला आणि हिऱ्याने आपला ताईत घट्ट हातात धरला. जीव मुठीत धरून एका झाडाच्या आडोशाला ते उभे राहिले आणि दगड फेकू लागले.

त्यामुळे दगडांचा मारा आणखीनच वाढला. आणि मग एकाएकी थांबला. त्यामुळे फॅटी जरा पुढे सरकला. तेवढ्यात

बिट्टू आणि हिऱ्या यांच्या माना मागून कोणी तरी पकडल्या. दोघांनी वर पाहिले तो एक अक्राळविक्राळ चेहरा त्यांना दिसला आणि मग एकदम दोघांची डोकी जोराने एकमेकांवर आपटली गेली, डोळ्यांपुढे अंधेरी येऊन ते दोघे खाली बसले आणि कोलमडले.

फॅटी मागे वळणार, एवढ्यात त्यालाही मागून कोणीतरी घट्ट मिठी मारली. त्यानेही वर पाहिले तो एक अक्राळविक्राळ चेहेरा. ती मिठी जास्त जास्त घट्ट होत चालली. आपल्या बरगड्या मोडतात की काय असे त्याला वाटू लागले. त्याला श्वास घेणे अशक्य झाले आणि त्याचे डोळे पांढरे पडायची पाळी आली.

'मेलो ! मेलो !' असे तो मोठ्याने ओरडला, पण ते ओरडणे जागच्याजागी गुदमरून गेले आणि एक चमत्कारिक आवाज तेवढा त्याच्या तोंडातून बाहेर पडला.

●

म. वं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. १८८२ दिनांक २४।११८६
विषय पा.ता.

# — २ —

फॅटीच्या बरगड्या इतक्या आवळल्या गेल्या होत्या की त्याला श्वास घेणेही अशक्य झाले होते. त्यामुळे त्याचे डोळे पांढरे व्हायची पाळी आली होती आणि थोड्याच वेळात आपली शुद्ध हरपणार हे त्याच्या ध्यानात आले. पण तो घाबरला नव्हता आणि आपल्याला ज्याने पकडले आहे ते भूत नसून माणूस आहे हेदेखील त्याच्या ध्यानात आले होते. त्याने ठरवले की शुद्ध हरपण्यापूर्वी काहीतरी प्रतिकार करायचा. त्याचे हात त्याच्या अंगाबरोबर जखडलेले होते, पण पाय मोकळे होते. तेव्हा त्याने आपली सारी उरलेली शक्ती एकवटून पाय उचलला आणि त्या भुताच्या पायावर हाणला. त्यासरशी भूत ओरडले. 'ओय, ओय!' फॅटीने पुन्हा पाय उचलला, पण त्याच वेळेला त्याचे शरीर लटके पडले आणि त्याची शुद्ध गेली.

फॅटीची अशी अवस्था झालेली पाहून त्या माणसाने त्याला सोडले आणि फॅटी एखादया पोत्यासारखा खाली कोसळला.

त्यानंतर त्या तिन्ही पोरांचे हातपाय बांधून ठवावे म्हणून त्या माणसाने दोरी काढली, पण तेवढ्यात एक बारीक शीळ त्याला ऐकू आली. त्यासरशी दोरी पुन्हा गुंडाळून आणि• ते तीन जळणारे पलिते विझवून तो टेकडीच्या दिशेने पळत निघून गेला.

थोड्या वेळाने पक्या, काउबॉय आणि खंड्या तिथे येऊन पोहोचले. काहीतरी घोटाळा झाला आहे हे खंड्याला अगोदरच कळले आणि त्यामुळे तो दुरूनच भुंकू लागला. पक्या आणि काउबॉय जवळ आले तेव्हा गँगचे तीन मेंबर बेशुद्ध पडलेले त्यांना आढळून आले. त्यासरशी पक्या एकदम आपल्या मित्रांची काळजी घ्यायला पुढे धावला.

ते दृश्य पाहून काउबॉय ओरडला, ' बाप रे ! साली भलतीच आफत आलेली दिसते. '

मग तोही आपल्या मित्रांना मदत करायला धावला. तेव्हा पक्या म्हणाला. ' थांब ! आपण दोघे त्यांच्या मदतीला गेलो तर त्यांच्यावर हल्ला करणारा माणूस आमच्यावरही हल्ला करील. तेव्हा तू हा दंडुका हातात घेऊन चौफेर लक्ष ठेव. '

तेवढ्यात हिऱ्या शुद्धीवर आला आणि उठून बसला. क्षणभराने आपण कोठे आहोत आणि काय प्रकार घडला ते त्याला आठवले आणि मग तो एकदम· किंचाळला. ' भूत ! भूत ! पळा, पळा ... '

तो खरेच उठून -पळायला लागणार होता, पण पक्याने त्याला घट्ट धरून ठेवले आणि म्हटले,. ' अरे हिऱ्या, घाबरू नको. आधी काय झाले ते सांगशील तर खरं ?'

' भुतानं आमची दोघांची डोचकी थाडदिशी एकमेकांवर

आदळली. चला, चला. पळा, पळा. नाहीतर भूत मारून टाकील आपल्याला.' हिऱ्याने भुताची चांगलीच धास्ती खाल्ली होती.

तेवढ्यात बिट्टूदेखील भानावर आला आणि उठून बसला. त्याच्यामागोमाग फॅटीदेखील हालचाल करू लागला.

पक्याने बिट्टूला विचारले, 'खरंच काय रे भूत आलं होतं?'

बिट्टूच्या डोक्याला दोनदा मार बसला होता. त्यामुळे त्याचे डोके चांगलेच सणकत होते. तो डोके दाबून धरत म्हणाला, 'भूत की काय माहीत नाही; पण टाळकं चांगलंच शेकलं त्यानं.'

'नाही कसं? त्याचा हात गारगार लागला माझ्या मानेला.' हिऱ्या ठासून म्हणाला.

तेवढ्यात फॅटी उठून बसला आणि डोके हालवून पूर्णपणे भानावर येण्याचा प्रयत्न करू लागला. त्याचे हात आपोआप त्याच्या दुखणाऱ्या बरगड्या चोळू लागले.

पक्याने त्याला विचारले, 'काय रे फॅटी खरंच भूत आलं होतं?'

'आयला! काय आवळलंय त्यानं मला? साला, नुसता चपाट होऊन गेलो.' फॅटीच्या बरगड्या चांगल्याच दुखत होत्या.

'पाहिलंस! भुतच होतं ते, भूत. त्यांनी आम्हांला ठार केलं असतं म्हणजे? आपण नायरे बा.' हिऱ्या पुन्हा तेथून पळण्याच्या तयारीला लागला.

'हॅट्? भूत कसलं! माणूस होता तो माणूस! मी त्याच्या पायावर बूट हाणला तेव्हा चांगला माणसासारखा 'ओय ओय' करून ओरडला.' फॅटीने भुताची आयडिया साफ

उडवून लावली.

त्यासरशी पक्याचा चेहेरा टवटवीत झाला.

तेवढ्यात, टेहळणी करणारा काउबॉय म्हणाला, ' अरे, त्या बघ दगडांच्या राशी कशा व्यवस्थित मांडून ठेवल्या आहेत. भुताला काय दगड गोळा करावे लागतात की काय ?'

पक्या उठला आणि त्याने काळजीपूर्वक त्या भागाची तपासणी केली. तेव्हा झाडाच्या फांद्यांना बांधलेले ते पलिते त्याच्या नजरेला पडले. त्यातला एक हिसकून काढत तो हिऱ्याला म्हणाला, ' ही पाहा भुताची दिवटी, कशी काळजीपूर्वक झाडाला बांधून ठेवली आहे ती. '

हिऱ्याने त्या दगडांच्या राशी आणि त्या दिवट्या पहिल्या आणि त्याची भीती पार पळून गेली. आपण उगीचच घाबरलो म्हणून त्याला शरमल्यासारखे झाले आणि आपल्याला फसवणाऱ्या माणसाचा त्याला भलताच राग आला. तो मुंडी हलवून ओरडला, ' सालं, मला फसवलं काय ? आणि आमची टाळकी आदळली एकमेकांवर ! त्या भुताचं आता टाळकं फोडतो आणि कंबरडंच मोडून टाकतो, चला रे. '

आणि तो वीरश्रीने एकदम पुढे धावू लागला. तेव्हा पक्याने त्याला आवरले. ' अरे असा पिसाळल्यासारखा धावलास तर तो माणून तुझा चेंदामेंदा करील. तो मोठा वस्ताद आहे हे विसरू नको. आपण चारही बाजूंना पाहात हळूहळू पुढे जाऊ या...आणि हे पाहा प्रत्येकानं एक मोठं दांडकं हातात घ्या. मी घेतलं आहे तसं. आणि त्या भुतानं गोळा केलेले हे दगड खिशात भरून घ्या. त्या भुताचा खिमा करून टाकू या आपण, खिमा. '

आणि मग पक्याची गँग चौफेर टेहळणी करीत मोठ्या आवेशाने पुढे निघाली. अवसान असे मोठे होते तरी प्रत्ये-काला डोक्यावर ओझे दिल्यासारखे आणि छातीवर दगड ठेवल्यासारखे वाटत होते. एकदा बिट्टूच्या डोक्यावर बारी-कसे लाल फळ पडले तेव्हा तो एकदम आकाशात उडाला आणि एकदा झाडीत काहीतरी खजबजले तेव्हा फॅटी एकदम मागे उडी घेऊन बिट्टूच्या अंगावर कोसळला. बिट्टू बिचारा साफ चिरडून गेला आणि त्यामुळे मोठ्याने ओरडला. पण त्याच्याकडे दुर्लक्ष करून फॅटी एकदम उठला आणि काठी उगारून त्या आवाजाच्या दिशेने धावला. पण तिथे कोणीच नव्हते. नाही म्हणायला, एक भला मोठा सरडा मात्र घाब-रून सरसर झाडावर चढून गेला. फॅटीने रागाने त्याच्यावरच काठी हाणली. पण सरडा निसटलाच आणि फक्त फॅटीचा हात तेवढा सणकला.

पक्या म्हणाला, ' ए बाबांनो, उगीच असं डोकं फिरल्या-सारखं करू नका. खरंच कोणी अंगावर चालून आला आणि त्या वेळी असा घायकुतेपणा केलात तर आपण सगळेच खलास होऊ. '

गँगचा लीडर झाल्यामुळे पक्याच्या अंगी भलताच पोक्त-पणा आला होता.

पक्याने असे सांगितल्यावर सगळेजण थंड डोक्याने चालू लागले. त्यांना वाटत होते की, आता आपल्यावर हल्ला होईल. थोडे पुढे गेल्यावर तरी नक्कीच होईल. पण तसे काहीच झाले नाही. पुढे जाता जाता अखेर झाडी संपली

आणि खडकाळ भाग सुरू झाला. ते खडक थेट समुद्रात गेले होते.

बिट्टू या खडकावरून चालत जाण्याकरिता म्हणून पुढे झाला, पण पक्याने त्याला हात धरून मागे झाडीत खेचले. तो म्हणाला, 'लेका दिसशील ना. तो मनुष्य इथेच कुठे तरी असणार.'

तेवढ्यात खंड्या कान टवकारून आणि शेपटी उभारून चौकस नजरेने त्या खडकांवरून पुढे जाऊ लागला.

तेव्हा फॅटी ओरडला, 'यू इडियट, मागे ये.'

मग सगळेच हात हलवून त्याला मागे बोलावू लागले, पण खंड्याच्या डोक्यात प्रकाश पडला नाही. उलट त्यांच्या त्या वेड्यावाकड्या हालचालींची गंमत वाटली आणि तो शेपटी हलवत वेड्यावाकड्या उड्या मारू लागला आणि मोठमोठ्याने भुंकू लागला.

पक्या संतापून म्हणाला, 'मी सांगत नव्हतो की, हा कुत्रा एक नंबरचा इडियट आहे म्हणून? आपण इथे आहोत हे आता सगळ्यांना कळणार.'

पण खंड्या वाटला तेवढा मूर्ख नव्हता. पक्याला असा रागवलेला पाहून आपले काहीतरी चुकले असे त्याला वाटले तसा तो मुकाट्याने मागे आला आणि पक्याच्या पायाजवळ बसला.

तेवढ्यात बिट्टू म्हणाला, 'ते बघ. तिकडे बघ!'

त्यांच्या डाव्या हाताला समुद्रात घुसलेले जे टेकाड होते तिकडे तो बोट दाखवत होता.

'काय रे? काय दिसलं? कोण आहे?'

‘ तिकडे, त्या टेकाडातून आता मला लाईट बाहेर येताना दिसला. ’

‘ कुठून ? कुठे ?’

‘ असा आतून येत होता. खालच्या बाजूनं अगदी समुद्राच्या जवळ तो पाण्यावर पडला होता. ’ बिट्टू आपल्या बोटाने ती जागा दाखवण्याचा प्रयत्न करीत म्हणाला.

‘ पण आता तर काही दिसत नाही. ’ पक्या त्या दिशेला न्याहाळून बघत म्हणाला.

एव्हाना सूर्य मावळला होता आणि तितकेसे स्पष्ट दिसत नव्हते.

‘ सालं उगीच काहीतरी. मघाशी त्याला भूत दिसलं ना, तसंच काहीतरी. ’ काउबॉय म्हणाला.

‘ पण ह्या इथे कोणीतरी माणसं आहेत हे अगदी शुअर. मगाचचा तो भूत झालेला माणूस अदृश्य झाला, तो गेला कुठे !’ पक्या उद्गारला.

‘ पहारे बुवांनो ! झाडावरून उडी मारील भूत. ’ फॅटीने आपले डोळे मोठाले केले आणि त्याचा चेहरा अधिकच वाटोळा गरगरीत दिसू लागला.

बिट्टू आणि हिऱ्या ह्यांनी नकळत टकटकत्या नजरेने चौफेर पाहिले. त्यामुळे काउबॉय आणि फॅटी हसू लागले. तेव्हा हिऱ्या चवताळून आपल्या हातातले दांडके सरसावीत म्हणाला, ‘ अरे येऊ दे. काय बिशाद त्याची. डोचकंच फोडून टाकीन त्याचं. ’

पक्या म्हणाला ‘ चला, आपण इतके आलोच आहोत तर त्या टेकाडाकडे जाऊन पाहू या. ’

बिट्टूने आपल्या डोक्यावरच्या टेंगळावरुन हात फिरवला आणि तो हळूच म्हणाला, ‘ बघा रे बाबांनो, काळोख पडायला लागला आहे. ’

पक्याने वळून एकदा सगळ्यांकडे पाहिले आणि तो म्हणाला. ‘ काय ? घरी जाऊ या का ? काळोख पडायला लागला आहे. थोड्याच वेळात काही दिसेनासं होईल. ’

काउबॉय म्हणाला, ‘ आपण असं करू या, की या टेकाडा-वरूनच पलीकडे जाऊ या. म्हणजे शॉर्टकट होईल आणि जाताजाता तेथे काय भुताटकी आहे तेपण पाहाता येईल. ’

ही आयडिया सगळ्यांनाच पटली आणि पक्याची गँग त्या टेकाडाच्या दिशेने चालू लागली. थोडा वेळ चालल्यानंतर त्यांना पाण्याचा एक अरुंद पट्टा लागला. खाडीचा एक हात त्या टेकाडाच्या कडेकडेने खूप आतवर घुसला होता.

‘ आता रे काय करायचं ? ’ बिट्टूने तोंडाचा चंबू केला.

काउबॉय म्हणाला, ‘ काय करायचं म्हणजे ? पोहत पलीकडे जायचं. ’

‘ पण मला कुठे पोहता येतंय ?’ बिट्टूचा खालचा ओठ चांगला मैलभर पुढे आला.

‘ तरी साल्या आम्ही तुला सांगत असतो की, पोहायला शिक, पोहायला शीक, पण तू ऐकलं नाहीस. पक्या याला आपल्या गँगमधून काढून टाक. ’ फॅटीने बिट्टूच्या पाठीत लहानसा धपका मारला.

‘ नाही हां. एकदा गँगचा मेंबर झाला की तो आपला माणूस. मग काय वाटेल ते झालं तरी त्याला काढायचं नाही.’ पक्याने फॅटीला ठणकावले.

‘ नाही रे मी आपला जोक केला. ’ फॅटीने खुलासा केला.

‘ हा पक्या लेकाचा कधी कधी भलताच सीरियस होतो. ’ काउबॉयने पक्याच्या डोक्यावर एक टप्पू मारला.

‘ लेको, काळोख पडतोय. गप्पा मारत बसू नका. चला. ’ पक्याने फालतू गप्पा थांबवल्या.

त्यासरशी फॅटी पुढे होऊन पाण्यात उतरला. तो दोन चार पावले पुढे गेला आणि म्हणाला, ‘ पाणी काही फारसं खोल नाही.’

पण त्याने आणखी एक पाऊल पुढे टाकले आणि तो सगळाच्या सगळा पाण्यात खाली गेला. त्याचे डोकेदेखील दिसेना, फक्त बुडबुडे तेवढे वर येत होते.

त्यासरशी पक्या आणि काउबॉय पुढे सरसावले, पण तेवढ्यात फॅटीचे डोके वर आले आणि मग फॅटीचा बराचसा भाग पाण्यावर आला.

‘ आयला, पाणी एकदम खोल लागलं रे. ’ फॅटीच्या नाका-तोंडातून पाणी बाहेर येत होते, आणि तो ठसकत होता.

‘ हॅट लेका, पाणी उडवून माझे सगळे कपडे भिजवून टाकलेस.’ काउबॉय फॅटीची टिंगल उडवू लागला.

‘ साला, नालायक,’ फॅटीने आणखी पाणी उडवून काउबॉयला पार भिजवून टाकले.

पक्याने फॅटीचा हात धरून त्याला पाण्याबाहेर ओढले आणि त्याला एक टप्पू मारला. ‘लेको, आता चावटपणा बस्स् झाला. पलीकडे कसं जायचं, ते बघा. ’

हा सगळा प्रकार पाहून हिऱ्या मोठमोठ्याने हसत होता.

तो म्हणाला, 'इथे पाणी खोल आहे. पण वरच्या अंगाला नसेल. चला मी बघून सांगतो तुम्हाला, कुठून पलीकडे जायचं ते.'

मग हिऱ्या पाण्याची पाहणी करीत करीत वरच्या बाजूला चालू लागला. थोडा वेळ चालल्यावर हिऱ्या पाण्यात उतरला आणि सहज चालत पलीकडे गेला. मग त्याने इतरांना आपल्या मागून या अशी खूण केली.

बिट्टू म्हणाला, 'तुला रे कसं कळलं इथं पाणी खोल नाही ते?'

हिऱ्या हसला, 'अरे, दर्याची आणि माझी लहानपणापासून ओळख आहे. त्याच्या पोटात काय आहे ते मला बरोबर कळतं.'

मग सगळे पलीकडे गेले. मात्र जाताना बिट्टूने पक्याचा हात घट्ट धरुन ठेवला होता. सगळे पलीकडे गेले तरी खंड्या कूं–कूं करीत मागेच उभा राहिला.

पक्याने त्याच्याकडे पाहिले आणि तो पुन्हा फॅटीला म्हणाला, 'सांगितलं नाही हा इडियट आहे म्हणून आणि आता तो भुंकायला लागेल. म्हणजे मग सगळ्या जगाला कळेल की आपण इथे आहोत म्हणून.'

तेव्हा फॅटी पुन्हा मागे गेला आणि तो कूं–कूं करणाऱ्या खंड्याला पकडू लागला. खंड्याला त्याचा बेत कळला. आणि तो इकडे तिकडे पळू लागला. तो काही फॅटीच्या हाताला लागेना.

पक्या म्हणाला, 'मरू दे लेकाचा, तो राहू दे तिकडेच. तू ये इकडे परत.'

तेव्हा फॅटी पुन्हा पाण्यातून पलीकडे गेला. खंड्याने तो कसा गेला ते मान वाकडी करून लक्षपूर्वक पाहिले. तो दोन पावले पुढे सरकलाही. पण पुन्हा मागे सरला आणि कूं-कूं करीत केविलवाण्या नजरेने त्या सर्वांकडे पहात राहिला.

त्याचे आता काय करावे याबद्दल पक्या काहीतरी बोलणार होता, तेवढ्यात काऊबॉय म्हणाला, ' अरे, हे पाहा काय ते. '

तेव्हा सगळ्यांनी तो बोट दाखवीत होता तिकडे पाहिले. टायरच्या खुणा होत्या त्या.

बिट्टू म्हणाला, ' अरे, त्या माझ्या सायकलच्या असतील.'

त्याने त्या खुणांकडे काळजीपूर्वक पाहिले नव्हते. पक्याने त्या खुणांकडे पुन्हा एकदा काळजीपूर्वक पाहिले आणि तो म्हणाला, ' इडियट ! या मोटारीच्या टायरच्या खुणा आहेत. मोटारीचेसुद्धा नाहीत. हे जीपचे टायर आहेत.'

' अरे लेको ! म्हणजे ती जीप इकडेही आली की काय ? आता सगळा उलगडा व्हायला लागला. ' काउबॉयच्या डोक्यात बरीच चक्रे फिरू लागली.

' म्हणून ते भूत, म्हणजे तो भुतोबा आपल्याला इकडे येऊ देत नव्हता. ' फॅटीने आपल्या भसाड्या आवाजात कॉमेंट केली आणि आपले गरगरीत डोके हलवले.

' लेका, बोंबलू नको, ते इथेच असतील ना जवळ कोठेतरी. ' पक्या खेकसला आणि मग त्या टायरच्या खुणा ज्या रस्त्याने पुढे गेल्या होत्या, त्या रस्त्याने आपण जायचे असे त्याने खुणेने सगळ्यांना सांगितले.

रस्त्याला चढ होता त्यामुळे थोडे पुढे गेल्यावर त्यांना

सगळी खाडी आणि खाडीत घुसलेले टेकाडाचे एक टोक दिसू लागले.

तेवढ्यात टेकाडाच्या पोटातून एक प्रकाशाचा झोत बाहेर आला आणि मग कसलेतरी इंजिन सुरू झाले.

'बघ, मी सांगितलं नव्हतं?' बिट्टू म्हणाला.

पक्याने त्याच्या तोंडावर हात ठेवला आणि तो कान देऊन ऐकू लागला.

तेवढ्यात एक छोटीशी होडी त्या टेकाडाच्या पोटातून बाहेर आली. तिच्या नाळेवर तो प्रकाशाचा जबरदस्त झोत टाकणारा विजेचा दिवा होता आणि तिच्यात तीन माणसे बसलेली होती. ती कोण होती ते वाढत्या अंधारात दिसत नव्हते. पण त्यातल्या एकाच्या डोक्यावर टोपी होती– जीपमधल्या ओळखीच्याशा वाटणाऱ्या माणसाच्या डोक्यावर होती तशी.

किनाऱ्याजवळच्या खडकातून वाट काढीपर्यंत त्या होडीवरचा दिवा पेटत होता. पण जेव्हा ती खडकातून बाहेर पडली तेव्हा तो दिवा विझला आणि फटफट आवाज करीत ती अंधारात अदृश्य झाली.

'आयला, हे साले त्या जीपमधलेच लोक दिसताहेत.' पक्या म्हणाला.

'पण जीपमध्ये दोघेच होते.' बिट्टूने शंका उपस्थित केली.

'अरे, तो तिसरा म्हणजे आपण पाहिलेलं भूत असेल. कसा गलेलठ्ठ दिसत होता?' फॅटी म्हणाला.

'तो गलेलठ्ठ! आणि लेका तू?' काउबॉयने फॅटीला टप्पू मारला.

यामुळे दोघांची झकाझकी होणार होती. पण तेवढ्यात पक्या म्हणाला, ‘चला, त्यांची होडी जिथून निघाली तिथे जाऊन पाहूया, तिथे कदाचित त्यांची जीप असेल.’

आणि ते सगळे चालू लागले, पण ते जरा पुढे गेल्यावर एकदम कुठूनतरी एका प्राण्याने पक्याच्या अंगावर उडी घेतली आणि पक्या धाड्दिशी खाली कोसळला.

सगळेच एकदम चमकले. जागच्या जागी खिळल्यासारखे झाले, मग त्यांच्या लक्षात आले की, एका दांडग्या कुत्र्याने पक्यावर झडप घातली आहे आणि दोघांची झटापटी चालली आहे.

पक्या आणि तो कुत्रा दोघेही जमिनीवर गडबडा लोळत होते. वरखाली होत होते. कधी पक्या वर, तर कधी तो कुत्रा वर असा प्रकार चालला होता.

काउबॉय आणि फॅटी दोघे पुढे धावले आणि त्या कुत्र्याला पकडण्याचा प्रयत्न करू लागले; तेवढ्यात एक काळा प्राणी हवेतून तीरासारखा आला आणि त्याने त्या कुत्र्यावर झडप घातली.

हा प्राणी कोण ते कोणालाच कळले नाही. पण नंतर सगळ्यांच्या ध्यानात आले की तो खंड्या होता. आपल्या माणसावर हल्ला होतो आहे, हे पाहून तो पाण्याची भीती विसरला होता आणि त्यांच्या संरक्षणाकरता धावला होता. पक्यावर हल्ला करणाऱ्या त्या दांडग्या कुत्र्यावर तुटून पडला होता.

त्या दोन कुत्र्यांची झटापट सुरू झाली. तेव्हा पक्या मोकळा झाला आणि एक लोळण घेऊन बाजूला झाला. त्याच्या अंगावर ओरखडे उठले होते आणि त्याच्या हाताला

जखम झाली होती.

पण त्याच्या दुखापतीकडे लक्ष द्यायला त्यालाही सुचले नाही आणि इतरांनाही सुचले नाही. सगळ्यांचे लक्ष त्या दोन कुत्र्यांच्या झटापटीकडे लागले होते. इतक्या वेगाने ते एक-मेकांना पंजे मारत होते, चावे घेत होते, कोलमडून पडत होते की त्यांना सोडवायचे कसे तेच कळत नव्हते.

खंड्यापेक्षा तो दुसरा कुत्रा दांडगा होता आणि त्याची नजरही विलक्षण क्रूर होती. पण एरवी सालस दिसणारी खंड्याची नजरही आता नुसती पेटल्यासारखी झाली होती. त्याचा त्वेष तर विलक्षण होता आणि चपळाई त्या दुसऱ्या कुत्र्यापेक्षा अधिक होती. त्या चपळाईमुळे तो पुन्हा पुन्हा त्या कुत्र्याच्या तावडीतून सुटत होता. आणि पुन्हा पुन्हा त्याच्या अंगावर तुटून पडत होता.

अखेर खंड्याने त्या कुत्र्याचे नरडे पकडले आणि घट्ट आवळून धरले. तो कुत्रा केवढ्याने तरी केकाटला, आपले नरडे सोडवून घेण्यासाठी विलक्षण धडपड करू लागला. त्याने उड्या मारल्या, सारे अंग हिसडले, तो कोलमडून उफराटा झाला आणि आपल्या पंजांनी खंड्याला लोटण्याचा व ओरबाडण्याचा प्रयत्न करू लागला. पण खंड्याने त्याचे नरडे जे धरले होते ते सोडलेच नाही.

तो भयंकर प्रकार पाहून बिटटू ओरडला, ' अरे, सोडवा-सोडवा त्याला नाहीतर मरेल तो कुत्रा.'

आणि खरेच त्या कुत्र्याची धडपड कमी होत होती. त्याचे डोळे मालवल्यासारखे दिसू लागले होते.

काउबॉय ओरडला, ' काय म्हणून सोडवायचा त्याला ?

तो पक्याचा जीव घेणार होता.'

पण तेवढ्यात पक्याच पुढे झाला आणि खंड्याला म्हणाला, ' खंड्या, सोड त्याला. '

पण खंड्या तसेच त्या कुत्र्याचे नरडे आवळून बसून राहिला. त्याचे डोळे इतके जळजळीत दिसत होते की त्याच्याजवळ जायचीदेखील भीती वाटत होती. काउबॉय पुढे सरला आणि पुन्हा मागे आला.

तेव्हा पक्या एकदम पुढे झाला आणि खंड्यावर ओरडला, ' खंड्या, सोड म्हटलं ना त्याला. '

आणि त्याने कुत्र्याचे पाय धरुन त्याला बाजूला ओढला.

क्षणभर सगळ्यांना वाटले की खंड्या आता पक्यावर हल्ला करणार. इतका तो बिथरल्यासारखा दिसत होता.

पण पक्या ओरडला, ' खंड्या ! '

तेव्हा खंड्या भानावर आल्यासारखा झाला आणि त्याने त्या कुत्र्याचे नरडे सोडले.

तो कुत्रा एकदम उसळून उभा राहिला. चार पावले धडपडत धावला आणि मग कोलमडून पडला. खंड्याने त्याचे नरडे फोडले होते आणि त्याच्या मानेतून रक्त व बुडबुडे बाहेर येत होते.

सगळ्यांनी जवळ जाऊन पाहिले तेव्हा आढळून आले की तो कुत्रा काही आता जगणे शक्य नाही. पक्याने त्याच्या पाठीवरुन हात फिरवला. तेव्हा त्याची शेपटी जराशी हलली आणि मग त्याची मान वाकडी झाली व पोट हलायचे थांबले.

बिट्टूचे अंग शहारले.

फॅटी म्हणाला, ' काय भयंकर कुत्रा होता. खंड्या आला नसता तर त्यानं तुला खलासच केलं असतं.'

खंड्या कान टवकारुन त्या कुत्र्याकडे पहात होता. पक्याने त्याची पाठ थोपटली आणि तो म्हणाला, ' तो बिचारा आपल्या धन्याचं काम करीत होता. हा खंड्या कसा माझ्यासाठी त्याच्यावर तुटून पडला, तसाच. '

' आणि तू लेका खंड्याला इडियट म्हणत होतास.' फॅटीने खंड्याला कुरवाळले.

तेव्हा पक्याने खंड्याला एकदम मिठी मारली आणि तो म्हणाला, ' मग काय, तो इडियटच आहे. होय की नाही रे खंड्या ? चला, आता, हा आपल्या गँगचा मेंबर झाला हां. '

खंड्याला जणू तो काय बोलला ते कळले. तो घशातल्या घशात भुंकला आणि त्याने जोरजोरात शेपटी हलवली.

तेवढ्यात हिऱ्या म्हणाला, ' हां, आता आलं ध्यानात. हा त्या वेड्या बुध्याचा कुत्रा. '

' हा कोण वेडा बुध्या ?' सगळ्यांनीच एकदम विचारले.

' तो आहे एक वेडा. केवढातरी दांडगा आहे. त्या तिकडे खाडीच्या तोंडाजवळ एक बेट आहे. तेथे तो असतो. ' हिऱ्याने सांगितले.

' मग मगाचचं भूत म्हणजे बुध्या तर नव्हे ?' पक्याने विचारले.

' आणि आता हे होडीतून त्या बेटावरच गेले की काय ? फॅटीने पुढचा प्रश्न विचारला.

' तिथे काय पण नाय. नुसता मोठा खडक आहे आणि थोडी झुडुपं आहेत. तिकडे कोणी जात नाही. कारण तिथे

भुताटकी आहे. कधी कधी रात्री एकदम तेथे मोठा जाळ पेटतो.' हिऱ्याने माहिती पुरवली.

'म्हणजे मघाशी आलं होतं तसलंच ना भूत?' काउबॉयने विचारले.

तेव्हा हिऱ्या लाजला आणि मग आवेशाने ओरडला. 'त्या भुताचे काढतो मी कांडात, दिसू दे तर खरं पुन्हा.'

पक्या डोके कराकरा खाजवीत म्हणाला, 'ही सगळी काहीतरी मोठी भानगड आहे. तिचा शोध आपण लावलाच पाहिजे. पण आधी आपण हा कुत्रा कशाची पाळत करीत होता ते पाहू या.'

'पण आधी औषध तर लाव, तुला लागलंय तेथे.' बिट्टूने आपल्या सायकलच्या मागे बांधलेल्या पिशवीतून फर्स्टएडचे सामान काढले आणि पक्याच्या जखमांवर डेटॉल फासटले.

त्यानंतर ते सगळे हळूहळू पुढे गेले आणि टेकाडाच्या अगदी टोकाला पोहोचले.

'इकडे तर काहीच दिसत नाही.' बिट्टू म्हणाला. अंधार पडल्यामुळे त्याला चांगलीच भीती वाटायला लागली होती.

'हा इकडे वळण घेऊन एक रस्ता गेला आहे तिकडे बघू या.' काउबॉयने सुचवले.

त्याप्रमाणे टेकाडाच्या टोकाला वळसा घेऊन ते पुढे गेले तेव्हा त्यांना एक मोठी गुहा दिसली. आत इतका अंधार होता की काहीच दिसत नव्हते.

'अरे बाप रे!' बिट्टू म्हणाला.

पण काउबॉयने टॉर्च पेटवला आणि तो गुहेत शिरला. जरा पुढे गेल्यावर तो ओरडला, 'अरे ही बघ ती जीप.'

गुहेत ती जीप होती. जवळच पाण्यात उतरायला रस्ता होता. कारण समुद्राचे पाणी थेट गुहेत आलेले होते.

गुहेत आणखी कोणी नाही ना, हे त्यांनी काळजीपूर्वक पाहिले आणि मगच हा सगळा काय प्रकार आहे त्याचा विचार करीत ते तेथेच उभे राहिले.

तेवढ्यात हिऱ्या ओरडला, 'तो पाहा, जाळ पेटला त्या बेटावर.'

' अरे, तो पाहा दुसऱ्याही बाजूला पेटला.' फॅटी ओरडला.

सारेच आश्चर्याने त्या पेटलेल्या जाळाकडे पाहात राहिले आणि मग एकदम पक्या म्हणाला, 'हे सगळं काय आहे ते शोधून काढलंच पाहिजे. चला आपण जाऊ त्या बेटावर. हिऱ्या, तुझी होडी आहे ना ?'

रात्रीच्या वेळी त्या बेटावर जायचे या कल्पनेने सगळ्यांचीच अंगे शहारल्यासारखी झाली. पण जसजसा वेळ जाऊ लागला तसतशी सगळ्यांनाच ती कल्पना आवडायला लागली. बिट्टूची भीती मात्र कमी होत नव्हती.

तो म्हणाला, ' पण जाणार कसे आपण तेथे ?'

'आपला हिऱ्या आहे ना ? तू नेशील ना रे आम्हाला तुझ्या होडीतून ?' पक्याने विचारले.

' पण बा रागवेल रातची होडी काढली तर.' हिऱ्या गाल चोळत म्हणाला.

बिट्टूला एकदम कल्पना सुचली. ' आपण असं करू या की, हिऱ्याच्या बालाच हा सगळा प्रकार सांगू या. म्हणजे तोच माणसं गोळा करून त्या बेटांवर जाईल आणि त्या तिघाना बेदम पिटून काढील.'

'अरे, पण आपण काय सांगायचं ? आणि त्यांना पिटून का काढायचं ? त्या तिघांनी आपल्याला काहीच त्रास दिला नाही. त्या भुताने आपल्यावर हल्ला केला खरा. पण ते भूत यांच्यापैकीच होतं असं आपण कसं म्हणणार ? ते जीपमधून आले आणि होडीत बसून त्या बेटावर गेले-म्हणजे आपल्याला तसं वाटतं. यात त्यांनी काहीच गुन्हा केलेला नाही. तेव्हा आपण हिऱ्याच्या बाजवळ तक्रार तरी काय करायची ?' पक्याने थंड डोक्याने बराच विचार केला होता.

'आणि समजा हिऱ्याचा बा चार माणसं घेऊन त्या बेटावर आला आणि तेथे कोणीच नसलं म्हणजे ? मग आपली चांगलीच फजिती होईल.' काऊबॉयने आणखी एक चांगल्यापैकी पॉईन्ट काढला.

'म्हणून आपणच जाऊ या. हिऱ्या, काढ ना तुझी होडी.' पक्याने डिसिजन घेऊन टाकला.

हिऱ्याने पुन्हा गाल चोळायला सुरुवात केली.

'अरे, त्या भुताचं तू टाळकं फोडणार होतास ना ? मग भूत तर त्या बेटावर गेलंय.' फॅटीने हिऱ्याचा वीक पॉईन्ट पकडला.

'हिऱ्या लेकाचा घाबरला !' काउबॉयने त्याला खिजवले.

तेव्हा हिऱ्या एकदम गरम झाला आणि म्हणाला, 'अरे, कोण घाबरतो ? चला मी नेतो तुम्हाला त्या बेटावर आणि करतो त्या भुताचा खिमा.'

'मग लौकर चला तर.' पक्या म्हणाला.

आणि सगळे त्या टेकाडाला समुद्राच्या बाजूने वळसा घालून घाईघाईने चालू लागले.

मध्येच पक्या म्हणाला, 'अरे, खंड्या कोठे आहे ?'

सगळ्यांनी मागे वळून पाहिले तर अंधारात खंड्या कुठे दिसेना. तेव्हा त्यांनी खंड्याला हाका मारल्या. काही वेळाने खंड्या लंगडत येताना त्यांना दिसला. त्या कुत्र्याशी केलेल्या मारामारीत खंड्या जखमी झाला होता हे त्यांच्या ध्यानातच आले नव्हते.

पक्याने खंड्याची पाठ थोपटली आणि तो म्हणाला, 'आता ह्या खंड्याचं काय करायचं ?'

'तो एकटा इथे राहायचा नाही.' फॅटी म्हणाला.

पक्याने पुन्हा आपले डोके कराकरा खाजवले आणि मग तो म्हणाला, 'आपल्यापैकी एक कोणीतरी किनाऱ्यावर राहायलाच हवं. तिथे काही झालं आणि आपण लौकर परत आलो नाही तर हिऱ्याच्या बाला कळवायला हवं. पुन्हा हा खंड्या आहेच. तेव्हा बिट्टू इथे किनाऱ्यावर थांब. तिकडे काही गडबड झाली तर मी टॉर्चने सिग्नल देईन. तीनदा टॉर्च पेटवला की समज काहीतरी गडबड आहे आणि हिऱ्याच्या बाला जाऊन सांग. आधी मात्र जाऊ नकोस.'

'वा, वा. मी काय म्हणून मागे राहीन. मी नाही राहाणार.' बिट्टू रागावला.

सगळ्यांनी त्याला खूप सांगून पाहिले. पण तो ऐकेना.

तेव्हा फॅटी म्हणाला, 'ठीक आहे. मी थांबतो इथे.'

हे ऐकून बिट्टूला शरमल्यासारखे झाले आणि तो मागे राहायला तयार झाला.

मग फॅटीने आपले खांद्यावर झोपलेले कबूतर त्याच्या खांद्यावर ठेवले आणि आपली सायकल, खंड्या आणि कबूतर

...३

सांभाळत बिट्टू किनाऱ्यावर थांबला.

'लौकर या हां.' त्याने सगळ्यांना बजावले.

'हो. हो.' असे म्हणत मग बाकीचे सगळे पाण्यात उतरले आणि पाण्यातून चालत चालत हिऱ्याच्या होडीत जाऊन बसले. हिऱ्याने होडीचा नांगर उचलला आणि पक्याची गँग खाडीतल्या त्या बेटाकडे निघाली.

बेटावर जाळ पेटले होते. बाकी सर्वत्र काळोख दाटला होता. होडी लाटांवर हिंदकळत होती. सगळ्यांच्या पोटात भीती डुचमळत होती आणि डोक्यात साहसाच्या अपेक्षा थैमान घालत होत्या.

□

म. ग्रं. सं., ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. १८२२ दिनांक २६।३।८६
विषय बा. वा. क्र. ..........

## — ३ —

होडीत बसताना गँगची जरा धांदलच उडाली होती. फॅटीने होडीत बसण्याकरता एक पाय आत टाकला तेव्हा होडी एका बाजूला इतकी कलंडली की, आत उभा असलेला काउबॉय तोल जाऊन पाण्यात पडला. पहिल्याने त्याचे डोके पाण्यात गेले. मग त्याने एक कोलांटी मारली आणि अखेर बरीच धडपड केल्यानंतर तो उभा राहिला, तेव्हा त्याच्या शर्टातून आणि पँटीच्या खिशातून बरेच पाणी बाहेर आले. त्याला मदत करण्याकरता जेव्हा फॅटी वाकला तेव्हा सगळी होडीच कलंडली आणि फॅटीला होडीखालून बाहेर यायला बरीच खटपट करावी लागली.

वल्हे वाहून जात होते ते हिऱ्याने आधी पकडले आणि मग तो सगळ्यांवर जोरात खेकसला. त्यानंतर त्याने पक्याच्या मदतीने होडी सारखी केली आणि सगळ्यांना आतले पाणी काढायला लावले. अखेर हिऱ्याच्या देखरेखी-खाली सगळी गँग होडीत बसली. काउबॉयचा विचार होता

की, होडीच्या कडेवर एक पाय देऊन ऐटीत उभे रहावे– एखाद्या चित्रपटातल्या नायकासारखे ! पण त्यामुळे होडी कलंडायची भीती असल्यामुळे हिऱ्या त्याच्या अंगावर मोठ्याने खेकसला आणि पक्याने टपली मारून त्याला खाली बसवले.

अखेर होडी चालायला लागली आणि सगळे उत्सुकतेने त्या बेटावरच्या जाळाकडे पाहू लागले. मिट्ट अंधार पडला होता. आकाशातले तारे आणि त्या बेटावरचा जाळ यांच्या पलीकडे काहीच दिसत नव्हते. मोठमोठ्या लाटा होडीला डोक्यावर घेत होत्या आणि मग ती दोन लाटांमधल्या खड्ड्यात पडत होती. वाटत होते की ती तशीच खाली जाणार. फॅटीच्या पोटातले शंकरपाळे, लाडू, चकल्या इत्यादी पदार्थ गरगरा फिरू लागले होते आणि उसळी घेऊन पोटातून बाहेर पडायचा प्रयत्न करीत होते. फॅटी मोठ्या निर्धाराने त्यांना अडवून ठेवायचा प्रयत्न करीत होता.

किनाऱ्यावरून थोडे दिसणारे अंतर तोडायला होडीला बराच वेळ लागला; अखेर हिऱ्या हलक्या आवाजात म्हणाला, ‘ आलो आपण.’

‘कुठे ? काहीच दिसत नाही !’ असे सगळ्यांनी उद्गार काढले. कारण त्यांना किनारा दिसलाच नाही.

‘ चिप् !’ हिऱ्या म्हणाला, आणि मग एकदम त्यांना अवघ्या चार हात अंतरावर असलेला खडकाळ किनारा दिसला.

हिऱ्याने हलकेच किनाऱ्याला होडी लावली आणि सगळी गँग त्या अंधारात उतरली.

कोरड्या जमिनीवर आल्यावर पक्याने सगळ्यांना एका झाडाच्या आडोशाला एकत्र केले आणि पुढे काय करायचे ते

तो त्यांना सांगू लागला.

तेवढ्यात काहीतरी खजबजले म्हणून ते चौघेही अंग चोरून अगदी गप्प उभे राहिले. पण बराच वेळ काहीच झाले नाही. तेव्हा त्यांनी पुन्हा कुजबुजायला सुरुवात केली. अखेर काय करायचे ते पक्के ठरून ते वेगवेगळ्या दिशांनी चालायला लागणार इतक्यात दोन बाजूंनी टॉर्चचे झोत त्यांच्या अंगावर पडले आणि करड्या आवाजात इंग्रजीत हुकूम झाला, ' हात वर करा, नाहीतर गोळ्या घातल्या जातील !'

टॉर्चच्या प्रकाशात रिव्हॉल्व्हरची नळी चमकली. तेव्हा पक्या म्हणाला, ' चला रे बुवा, हात वर करा.'

मग त्या करड्या आवाजाने हिंदुस्थानीत हुकूम केला. ' यांचे हात बांधून टाक. '

तेव्हा एक काळा अजस्र मनुष्य पुढे झाला आणि त्याने त्यांचे हात बांधून टाकले.

तो परदेशी आवाज पुन्हा म्हणाला, ' मला शंका आलीच होती की ही पोरं आपल्या मागावर आहेत. म्हणून मी टेहळणी करायला सांगितले होते. त्या पोरांना खलास करायला हवे. नाहीतर या बेटाचा उपयोग आपल्याला पुन्हा करता यायचा नाही. '

त्यावर दुसरा आवाज अर्धवट हिंदुस्थानीत आणि अर्धवट इंग्रजीत त्याला म्हणाला, ' उगाच पिस्तुलाचे आवाज कशाला ? त्यापेक्षा यांना इथल्या जुन्या वाड्याच्या तळघरात ठेवूया. इथे कोणी येत नाही आणि आले तरी यांचा आवाज बाहेर यायचा नाही. तेव्हा कोणालाही यांचा पत्ता लागायचा नाही.'

' ठीक है. ' तो करडा परदेशी आवाज म्हणाला.

'चला रे पोरांनु,' तो काळा अजस्र माणूस म्हणाला आणि पक्याला त्याने धक्का मारला. आणि मग पुढे तो काळा अजस्र माणूस व मागे तो पिस्तूल रोखणारा परदेशी माणूस अशा थाटात पक्याची गँग ठेचाळत धडपडत, त्या जुन्या भयाण वाड्यात शिरली. मग कर्रर्रऽऽ कुईऽऽ असा आवाज करीत तळघराचे दार उघडले गेले आणि त्या काळ्या माणसाने या चौघांना आत ढकलून दिले व दार बंद करून घेतले. ते चौघेही त्या अंधाऱ्या अरुंद जिन्यावरून ठेचाळत खाली कोसळले आणि मग तळघराचे दार बंद करुन घेण्यात आले.

तळघरात इतका मिट्ट अंधार होता की, डोळ्यात बोट घातले तरी दिसत नव्हते. आतल्या ओलसर हवेला चमत्कारिक शिळा वास येत होता. कोणीतरी प्राणी सरसरल्याचे आवाज मध्येच कानावर येत होते आणि समुद्राच्या पाण्याचा घुड्म् घुड्म् असा धडका मारल्यासारखा आवाज एका बाजूने काहीसा दुरून कानांवर येत होता.

'साली भलतीच आफत.' फॅटी उद्गारला.

'पण एक-चांगली गोष्ट झाली आणि ती म्हणजे त्यांनी आपल्या खिशातल्या वस्तू काढून घेतल्या नाहीत. त्यामुळे माझा चाकू खिशातच आहे.'

'हो, हो आणि माझी दोरी मी पोटाभोवती गुंडाळली होती तीदेखील माझ्याजवळ आहे.' काउबॉय म्हणाला.

'हॅट् ती दोरी काय खायची आहे?' फॅटी म्हणाला आणि मग तो मोठ्याने ओरडून पाय झटकू लागला.

'अरे, असा काय ओरडतोस? मी, तो ... ' पक्या म्हणाला.

‘ आयला, मला वाटले उंदीर नाहीतर साप आला म्हणून.’ फॅटी म्हणाला.

‘ मला तू नको आहेस. मी हिऱ्याला शोधतो आहे, त्याचे हात लहान आहेत. त्याला माझ्या खिशातला चाकू काढता येईल.’ पक्या चाचपडत म्हणाला.

अखेर पक्याला हिऱ्या सापडला. मग एकमेकांच्या पाठीला पाठ लावून ते बसले आणि हिऱ्या आपल्या बांधलेल्या हातांपैकी एक हात पक्याच्या खिशात खुपसायचा प्रयत्न करू लागला. काउबॉय पक्याच्या खिशातला चाकू वर सरकवून हिऱ्याला मदत करू लागला. दोन हात एकत्र जखडलेले असल्यामुळे आणि तेदेखील पाठीमागे-- हिऱ्याला पक्याचा खिसा सापडेना. सापडला तरी हात घुसेना आणि घुसला तरी पुरेसा खोल पोहोचेना. अखेर पंधरावीस मिनिटे धडपडल्यावर चाकू एकदाचा खिशाबाहेर आला. पण तो बाहेर आल्यावर हिऱ्याच्या हातातून खाली पडला. मग बराच वेळ सगळ्यांच्या हातांनी वळवळ केली. चाकूऐवजी एकमेकांचे हातच बऱ्याच वेळा पकडले जात. पण अखेर चाकू काउबॉयच्या हातात सापडला. त्यानंतर मग पाठीला पाठ लावून बराच वेळ धडपड केल्यावर आणि दोघांच्याही हातांना जखमा झाल्यावर चाकू उघडला गेला. उघडलेला चाकू पक्याने घट्ट हातात धरला आणि पक्या आपल्या हातांना बांधलेली दोरी त्यावर घासू लागला. हात पाठीमागे बांधलेले असल्याकारणाने हे फारच कठीण पडत होते आणि पुष्कळदा दोरीऐवजी मनगटच चाकूच्या पात्त्यावर घासले जात होते. पण अखेर बराच वेळ खटपट केल्यावर एकदाची दोरी तुटली.

मग मात्र पक्याने आपल्या मोकळ्या झालेल्या हातांनी भराभर सगळ्यांच्या हातांना बांधलेल्या दोऱ्या कापल्या आणि त्यांचे हात मोकळे केले. त्यामुळे सगळ्यांनाच हुरूप आला.

फॅटीने आपल्या खिशातला टॉर्च काढला आणि तो सर्व बाजूंना फिरवून, ते तळघर होते तरी केवढे ते पाहून घेतले. तळघर फार मोठे नव्हते; पण ते आतून सगळे ओलेओले आणि चिखलाने बरबटलेले होते. त्याच्या एका चिंचोळ्या बाजूला मात्र भिंत नव्हती. तिथे काहीच नव्हते. एक गुहे-सारखा बोगदा त्या बाजूला होता आणि समुद्राच्या पाण्याचा आवाज त्याच बाजूने येत होता.

तेवढ्यात काउबॉय ओरडला आणि त्याने आपला पाय जोराने झटकला.

'काय रे ?' आणि फॅटीने त्याच्या पायावर टॉर्चचा झोत टाकला. तेव्हा एक भला मोठा काळा खेकडा एकदम बाजूला झाला आणि काउबॉयच्या आंगठ्यातून रक्त वाहू लागले.

'आयला, केवढा मोठा खेकडा रे !' फॅटी ओरडला.

तेवढ्यात हिऱ्याने आपल्या टार्चेच्या एका दणक्याने त्या खेकड्याला चिरडून टाकले.

काउबॉयने रुमालाने आपला पाय बांधून टाकला आणि तो म्हणाला, 'साले इथे खेकडे कुठून आले रे ?'

'आणि ही ओल, हा चिखल इथे कसा ?' फॅटीने टॉर्च फिरवत प्रश्न केला.

'सालं ते मरू दे. आता इथून बाहेर कसं पडायचं ते बघा.' काउबॉय म्हणाला.

'तळघराचं दार तपासून बघू या का ?' फॅटीने त्या अरुंद

जिन्यावर टॉर्चचा झोत टाकीत विचारले.

'नाही रे, ते त्यांनी पक्क बंद करून टाकलेलं असणार. इकडे हा बोगदा आहे तिकडेच ट्राय करू या.' पक्या चौफेर नजर फिरवीत म्हणाला.

'तिकडे दर्या हाय. भरतीच्या वेळी दर्याचं पाणी आत येत असावं. म्हणून ही ओल आणि हा चिखल इथे आहे.' हिऱ्या कमरेवर हात ठेवून म्हणाला.

'बाप रे! फॅटी, बघ रे किती उंचापर्यंत ओल आहे ती. म्हणजे भरतीच्या वेळी हे तळघर पाण्यानं किती भरतं ते तरी कळेल.' काउबॉयने भलताच प्रश्न उपस्थित केला.

फॅटीने टॉर्च फिरवला आणि तो ओरडला. 'आयला, थेट वरपर्यंत ओल आहे रे.'

'म्हणजे, भरती आली की खल्लास!' काउबॉय ओरडला.

पक्याने मान हलवली, 'अरे लेको, भरतीचं पाणी ज्या रस्त्यानं आत येतं त्यातून आपल्याला नाही का बाहेर जाता यायचं?'

'आयडिया!'

'साले पक्याचं डोकं नुसतंच टणक नाही, बरं का!'

हिऱ्या म्हणाला, 'मी तोच इचार करीत व्हतो.'

मग सगळेच त्या बोगद्यातून हळूहळू पुढे जाऊ लागले. थोडी पावले गेल्यावर त्या बोगद्यातला रस्ता एकदम उतरता झाला आणि पुढे तो सगळा बोगदा पाण्याने भरून गेलेला दिसला.

'च्यायला, यातून रे कसं जाणार?' फॅटीने दोन्ही हाताने डोके दाबले.

'का ? पाण्याखालून जाता येत नाही होय ?' हिऱ्या एकदम पुढे सरसावला.

'अरे, तू एक जाशील. आम्ही कसे येणार ? सालं या फॅटीला पोहोता येत नाही आणि या अंधारात दिसणार तरी कसं ?' काउबॉयने अडचणींची यादी तयार केली.

'माझ्या मागून या.' हिऱ्या म्हणाला.

मग पक्याने ती बाब आपल्या हातात घेतली. 'काउबॉय, तुझा तो दोर सोड. हिऱ्या, तू या दोराचं एक टोक घेऊन बाहेर जा आणि किनाऱ्यावर पोहोचलास म्हणजे तो दोर जरासा ओढ. तीनदा ओढ हां. मग आम्ही त्या दोराच्या दुसऱ्या टोकाला धरू आणि बाहेर येऊ.'

'हो, आणि हिऱ्याला बाहेर जायचा रस्ता सापडला नाही तर तो या दोराला धरून परत येऊ शकेल.' काउबॉयने डोके चालवले.

'आहे, आहे. डोकं आहे; अगदीच खोकं नाही !' पक्याने काउबॉयच्या डोक्यावर टकटक केले. मग तो पुढे म्हणाला, 'लेको, आपापल्या खिशातल्या वस्तू सांभाळा हं. आणि फॅटी तुझ्या खिशात वेफरची प्लास्टिकची पिशवी होती ना ! ती काढ बरं. तिच्यात आपला टॉर्च गुंडाळून घेऊ या. नाहीतर तो खलास होईल. आणि हे बघा. आपले हात ज्या दोऱ्यांनी बांधले होते ना, त्या पण घ्या. त्या उपयोगी पडतील.'

पक्याने अशा प्रकारे एखाद्या संसारी बाईप्रमाणे सगळ्या बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष देऊन सर्व तयारी केली; आणि मग हिऱ्याने दोरी हाताला बांधून त्या अंधाऱ्या बोगद्या-

तल्या पाण्यात बुडी मारली. पाहाता पाहता तो अदृश्य झाला.

दोरी जास्त जास्त ओढली जात होती. हा प्रकार इतका वेळ चालला होता की, काउबॉयच्या हातातले दोरीचे भेंडोळे संपत आले. काय होते आहे हे त्या तिघांना कळेना. इतका वेळ हिऱ्या आपला श्वास कोंडून धरू शकेल हे त्यांना खरेच वाटेना. आपल्यालाही तसेच करावे लागणार ह्या कल्पनेने ते चांगलेच घाबरून गेले.

काउबॉयच्या हातातले दोरीचे भेंडोळे संपले आणि त्याच्या हातातले दोरीचे टोक निसटणार होते; तेवढ्यात पक्याने ते पकडले आणि तो अर्धवट पाण्यात खेचला गेला.

'थांब. थांब. दोरी ओढून धर.' फॅटी ओरडला.

'तसं नाही चालायचं. त्याला पुढे जाता आलं पाहिजे. नाहीतर तो गुदमरेल. हे बघ आपण हाताची साखळी करू या आणि त्याच्या मागोमाग जाऊ या.' पक्या ओरडला.

ताबडतोब त्या तिघांनी हातांची साखळी केली आणि ते पाण्यात खेचले गेले. पक्या तर इतका खोल पाण्यात गेला की, त्याचे नाक तेवढे वर राहिले होते आणि पाण्याच्या एका सपकाऱ्याबरोबर तेदेखील थोडा वेळ पाण्याखाली गेले.

सुदैवाने त्याच वेळी दोरी ओढली जात होती ती थांबली. मग बराच वेळ काहीच झाले नाही. पक्याला जेमतेम श्वास घेता येत होता. अखेर दोरीला तीन हिसके बसले. तेव्हा पक्या म्हणाला, 'चला, त्यानं इशारा दिला आहे. तुम्ही दोघे मला धरून पुढे व्हा. दोरीचं टोक पकडा आणि मग खोल श्वास घेतल्यावर द्या बुडी.'

'आयला ! आपण काही वर जाऊ असं वाटत नाही मला.'

फॅटी चांगलाच घाबरला होता.

'अरे, आता तर काय फार सोपं आहे! तो आपल्याला ओढून घेणार वर. फार तर थोडं खारं पाणी पिऊ इतकंच काय ते.' पक्या मोठ्याने हसला आणि त्याने फॅटीच्या पाठी-वर थाप मारली.

तेव्हा फॅटीने एकदम खोल श्वास घेतला आणि पाण्यात बुडी मारली. त्याच्या मागोमाग काउबॉय अदृश्य झाला आणि मग पक्याने सूर मारला.

अंधारात काहीच दिसत नव्हते. कुठे जातो आहे ते कळत नव्हते. सारखे अंगाला काहीतरी लागून खरचटत होते. कोंड-लेला श्वास अस्वस्थ करीत होता; आणि तरी पाण्यातला तो प्रवास संपतच नव्हता!

पुढे पुढे तर कोंडलेल्या श्वासामुळे डोकं फुटणार असे वाटू लागले. छातीतून कळा येऊ लागल्या. फॅटीचा तर श्वास सुटला आणि बुडबुडे काढून तो पाणी प्यायला. त्याचा दोरीवरचा हात सुटला. पण काउबॉयने आणि पक्याने त्याला घट्ट पकडले आणि अखेर ताकद संपल्यानंतर कितीतरी वेळाने ते पाण्यावर आले.

पक्या आणि काउबॉय कसेबसे किनाऱ्यावर पोहोचले आणि मोठमोठे श्वास घेत कितीतरी वेळ खाली पडून राहिले. हिऱ्याने फॅटीला ओढून किनाऱ्यावर आणले आणि त्याची छाती दाबून त्याच्या पोटातले पाणी बाहेर काढले. बऱ्याच वेळाने तो व्यवस्थित श्वास घेऊ लागला.

हिऱ्या पक्याला काहीतरी सांगू लागला. पण पक्याने त्याला तोंडावर बोट ठेवून गप्प केले आणि तो तसाच धापा

टाकीत राहिला.

काही वेळ गेल्यावर त्या तिघांनाही जरा हुषारी वाटू लागली. मग पक्या उठला आणि त्याने चारही बाजूंना जाऊन टेहेळणी केली. जवळपास कोणी नाही, अशी खात्री झाल्यावर त्याने सगळ्यांना जवळ ओढून एक कोंडाळे केले आणि तो हलक्या आवाजात म्हणाला, 'आता पहिली गोष्ट म्हणजे किनाऱ्याच्या बाजूला जाऊन बिट्टूला सिग्नल करायचा. काउबॉय, पाहा बरं टॉर्च चालतो आहे का?'

काउबॉयने पिशवीचे तोंड सोडून टॉर्च बाहेर काढला आणि तो लावून पाहिला.

पक्याने चटकन् टॉर्चच्या काचेवर आपला हात ठेवला आणि तो खेकसला. 'इडियट, असा का टॉर्च लावायचा? सगळ्या जगाला कळेल आपण इथे आहोत म्हणून.'

मग टॉर्च हातात घेऊन तो हळूहळू किनाऱ्याच्या बाजूला गेला आणि तिन्ही बाजूंना उंच खडक असलेल्या एका जागी किनाऱ्याकडे तोंड करून उभा राहिला.

मग त्याने हातातला टॉर्च तीनदा पेटवून ठरल्याप्रमाणे बिट्टूला इषारा केला. असे चार–पाचदा केल्यावर किनाऱ्यावर एक टॉर्च दोनदा लुकलुकला.

पक्या परत आला आणि जरासा रागावून म्हणाला, 'ह्या बिट्टूने घोटाळा केलाच. मी त्याला सांगितलं होतं की, तू टॉर्च पेटवून आम्हाला उलट खूण करू नकोस म्हणून. आता इथल्या लोकांनी ते पाहिलं असलं म्हणजे?'

फॅटी म्हणाला, 'तू तरी फारच करतोस बुवा! आपला सिग्नल त्यानं पाहिला हे आपल्याला कळायला नको का?

नाही तर ते कसं कळलं असतं ?'

काउबॉयने फॅटीच्या तोंडावर हात ठेवला, 'ए बाबांनो, भांडण नको. चला आता आपण आपल्या होडीत बसून जाऊ आणि जाताना त्यांची पण होडी घेऊन जाऊ. म्हणजे बसतील ते इथेच अडकून.'

'आपण सगळ्यांनी कशाला जायचं ? हिऱ्या आणि फॅटी जाऊ देत. मी आणि काउबॉय इथेच थांबतो यांच्यावर लक्ष ठेवायला.' पक्या आणखी पुढचा विचार करीत होता.

'साला इडियट! आणि आपली होडी गेलेली पाहून त्यांना संशय येईल तो ? मग ते तुम्हाला शोधून काढून रिव्हॉल्व्हरनं खलास करतील.' फॅटीला हा बेत बिलकुल नापसंत होता.

पक्याने थोडा वेळ विचार केला. मग तो म्हणाला, 'निदान जाण्यापूर्वी ते कोठे आहेत, काय करताहेत ते तरी पाहू या. हिऱ्या, तू पुढे हो. आम्ही तुझ्या मागून येतो.'

मग हिऱ्या किनाऱ्याजवळच्या खडकावरून चढून वर गेला, आणि एका खडकाच्या आडोशाला उभा राहून पाहू लागला. थोड्या वेळाने त्याने खूण केली; तिघेही त्याच्याजवळ गेले आणि पाहू लागले.

त्या बेटाच्या मध्यभागी चांगले प्रशस्त मैदान होते. तिथे तो गोरा माणूस आणि दूसरा एक माणूस असे दोघे उभे असलेले जाळाच्या प्रकाशात दिसत होते. पण तो जाळ आता विझत आला होता आणि तो पुन्हा पेटवायचा प्रयत्न ते दोघेही करीत नव्हते. त्यानी मैदानाच्या चार टोकांना चार मोठे टॉर्च जमिनीत उलटे खुपसून ठेवले होते. आकाशाकडे तोंड करून ते झगागत होते.

हिऱ्या म्हणाला, ' अरे, हे तर भिकुशेट ! आमच्या गावातले मोठे सावकार. हे इथे काय करताहेत ?'

पक्या म्हणाला ' अरे, इथे दोघेच दिसताहेत. काउबॉय, तू मागे जा आणि दोन्ही बाजूंना टेहळणी कर. नाहीतर तो तिसरा माणूस मागून येऊन आपल्या सगळ्यांना पकडेल. टॉर्च वगैरे लावू नकोस हं. '

' येऊ दे, येऊ दे. मला त्याचं टाळकंच फोडायचं आहे.' ' हिऱ्या एकदम चवताळला.

पक्याने त्याच्या तोंडावर हात ठेवला आणि काउबॉयला ढकलून मागे पाठवले.

मैदानातल्या त्या दोघांचे लक्ष उघड्या समुद्राकडे होते. ते एवढे काय बघताहेत म्हणून पक्याने समुद्राकडे पाहिले तेव्हा त्याला आकाशात एक मोठा तारा दिसला.

तो मोठामोठा होत होता. आणि मग इंजिनची अस्पष्ट घरघर कानावर आली. तेव्हा सगळ्यांनी ओळखले की ते विमान आहे. तो गोरा माणूस हातातल्या टॉर्चने ह्या विमानाला खुणा करीत होता.

' आयला, हे पाकिस्तानचं विमान काय रे ? पाकिस्तानी हल्ला करताहेत की काय आपल्यावर ! ' फॅटी मोठ्याने ओरडणार होता. पण वेळीच त्याने आपला आवाज आवरला.

' थांब, काय होतंय ते, पाहूया !' पक्याने फॅटीच्या डोक्यात एक टपली मारली, मग तो काउबॉयजवळ धावत जाऊन म्हणाला, ' तू विमानाकडे पाहू नकोस. तो माणूस कोठून येतो आहे का त्यावर नजर ठेव.'

त्या विमानाचा आवाज हळूहळू मोठा झाला आणि मग

कानठळया बसवत ते अगदी खाली आले आणि त्या बेटा-वरून पुढे निघून गेले. त्यासरशी त्या गोऱ्या माणसाने उडी मारली आणि भिकुशेटच्या पाठीत थाप मारली. त्या जाळाच्या आता अंधुक झालेल्या प्रकाशात ते पक्याच्या गँगला दिसले.

हिऱ्या म्हणाला, 'म्हणजे, हे बॉम्ब टाकणार की काय आमच्या गावावर ?'

'नाही रे. गावावर बाँब टाकून काय फायदा आहे ? आणि हे मुळी लढाऊ विमानच नाही. हे आहे साधं विमान. पण एकंदर काहीतरी बरीच भानगड दिसते आहे. चला, आपण ताबडतोब गावात जाऊन लोकांना आणि पोलिसांना सांगू या.' पक्याने सगळ्यांना ओढले आणि ते आपल्या होडीकडे जाऊ लागले.

हिऱ्या तर धावायलाच लागला. पण पक्याने त्याला अडवले. 'अरे बाबा, हळू. तो तिसरा माणूस इथे कोठे असला तर ?'

मग हळूहळू चारही बाजूंना पाहात ते होडीकडे गेले. त्यांना एक मोठा खडक आपल्या होडीजवळ किनाऱ्यावर आहे असे वाटले. मग तो खडक हलला तेव्हा त्यांना कळले की, तो अजस्र माणूस तेथे पहारा करीत बसला आहे.

सगळेजण एकदम जागच्या जागी गप्प उभे राहिले आणि मग पक्या त्या सर्वांना बराच मागे घेऊन गेला.

'आता काय करायचं ?' फॅटीने सगळ्यांच्या मनातला प्रश्न उच्चारला.

'मी मागून गपचिप जाऊन त्याच्या टाळक्यात काठी हाणतो.' हिऱ्याने बाह्या सरसावल्या.

पक्या म्हणाला, ' उगीच अशी घाई करू नका. '

त्याने डोके खाजवले. तेवढ्यात पुन्हा कानठळ्या बसवणारा आवाज करीत ते विमान आले आणि त्या बेटावर अगदी खाली झेप घेऊन पुढे निघून गेले.

पक्या म्हणाला, ' हां, सुचलं, आता ते विमान पुन्हा नक्की इथे येणार. त्या वेळेला आपण त्या माणसावर हल्ला करायचा. '

' आपण चौघेही काठ्या घेऊन त्याच्या अंगावर धावून जाऊ या.' काउबॉयच्या अंगात वीरश्रीच संचारली.

' हे पहा, आपल्याजवळ काठ्या नाहीत. शिवाय तो इतका तगडा आहे की, आपणा–चौघांनाही पुरून उरेल. त्यापेक्षा असं करू या .... ' आणि पक्याने आपला बेत गँगला सांगितला.

मग त्या माणसापासून वीस–पंचवीस फूट अंतरावर काउबॉय आणि हिऱ्या, काउबॉयची दोरी ताणून धरून बसले. दोरी जमिनीपासून एक फूट उंचीवर ताणलेली होती. नंतर तेथेच एक झाड होते त्यावर फॅटी चढला. म्हणजे सगळ्यांनी त्याला चढवले आणि बरोबर त्या दोरीच्या वर एक जाडी फांदी होती, तिच्यावर तो बसून राहिला.

पक्या हातात टॉर्च घेऊन त्या दोरीच्या पलीकडे उभा राहिला. आपल्या दुसऱ्या हातात त्याने दोन–तीन मोठाले दगड घतले. विमानाचा घरघराट पुन्हा मोटा होऊ लागला तेव्हा पक्याने एक दगड जोराने त्या माणसाच्या अंगावर मारला.... आणि त्याच वेळी हातातला टॉर्च पेटवला. त्या माणसाने मागे वळून पाहिले तेव्हा पक्याने दुसराही दगड

...४

कानठळया बसवत ते अगदी खाली आले आणि त्या बेटा-वरून पुढे निघून गेले. त्यासरशी त्या गोऱ्या माणसाने उडी मारली आणि भिकुशेटच्या पाठीत थाप मारली. त्या जाळाच्या आता अंधुक झालेल्या प्रकाशात ते पक्याच्या गँगला दिसले.

हिऱ्या म्हणाला, 'म्हणजे, हे बॉम्ब टाकणार की काय आमच्या गावावर ?'

'नाही रे. गावावर बाँब टाकून काय फायदा आहे ? आणि हे मुळी लढाऊ विमानच नाही. हे आहे साधं विमान. पण एकंदर काहीतरी बरीच भानगड दिसते आहे. चला, आपण ताबडतोब गावात जाऊन लोकांना आणि पोलिसांना सांगू या.' पक्याने सगळ्यांना ओढले आणि ते आपल्या होडीकडे जाऊ लागले.

हिऱ्या तर धावायलाच लागला. पण पक्याने त्याला अडवले. 'अरे बाबा, हळू. तो तिसरा माणूस इथे कोठे असला तर ?'

मग हळुहळू चारही बाजूंना पाहात ते होडीकडे गेले. त्यांना एक मोठा खडक आपल्या होडीजवळ किनाऱ्यावर आहे असे वाटले. मग तो खडक हलला तेव्हा त्यांना कळले की, तो अजस्र माणूस तेथे पहारा करीत बसला आहे.

सगळेजण एकदम जागच्या जागी गप्प उभे राहिले आणि मग पक्या त्या सर्वांना बराच मागे घेऊन गेला.

'आता काय करायचं ?' फॅटीने सगळ्यांच्या मनातला प्रश्न उच्चारला.

'मी मागून गपचिप जाऊन त्याच्या टाळक्यात काठी हाणतो.' हिऱ्याने बाह्या सरसावल्या.

पक्या म्हणाला, ' उगीच अशी घाई करू नका. '

त्याने डोके खाजवले. तेवढ्यात पुन्हा कानठळ्या बसवणारा आवाज करीत ते विमान आले आणि त्या बेटावर अगदी खाली झेप घेऊन पुढे निघून गेले.

पक्या म्हणाला, ' हां, सुचलं, आता ते विमान पुन्हा नक्की इथे येणार. त्या वेळेला आपण त्या माणसावर हल्ला करायचा. '

' आपण चौघेही काठ्या घेऊन त्याच्या अंगावर धावून जाऊ या.' काउबॉयच्या अंगात वीरश्रीच संचारली.

' हे पहा, आपल्याजवळ काठ्या नाहीत. शिवाय तो इतका तगडा आहे की, आपणा–चौघांनाही पुरून उरेल. त्यापेक्षा असं करू या .... ' आणि पक्याने आपला बेत गँगला सांगितला.

मग त्या माणसापासून वीस–पंचवीस फूट अंतरावर काउबॉय आणि हिऱ्या, काउबॉयची दोरी ताणून धरून बसले. दोरी जमिनीपासून एक फूट उंचीवर ताणलेली होती. नंतर तेथेच एक झाड होते त्यावर फॅटी चढला. म्हणजे सगळ्यांनी त्याला चढवले आणि बरोबर त्या दोरीच्या वर एक जाडी फांदी होती, तिच्यावर तो बसून राहिला.

पक्या हातात टॉर्च घेऊन त्या दोरीच्या पलीकडे उभा राहिला. आपल्या दुसऱ्या हातात त्याने दोन–तीन मोठाले दगड घतले. विमानाचा घरघराट पुन्हा मोटा होऊ लागला तेव्हा पक्याने एक दगड जोराने त्या माणसाच्या अंगावर मारला ... आणि त्याच वेळी हातातला टॉर्च पेटवला. त्या माणसाने मागे वळून पाहिले तेव्हा पक्याने दुसराही दगड

...४

त्याच्या अंगावर भिरकावला, मग तिसरा. त्यासरशी तो माणूस खवळून पक्याच्या अंगावर धावून आला. पक्या पळू लागला. टॉर्च मात्र त्या माणसाकडे तोंड फिरवून पेटत ठेवला होता. पक्याला पळताना पाहून तो माणूस अधिकच जोराने धावू लागला आणि मग हि-या व काउबॉय यांनी ताणून धरलेल्या दोरीला अडखळून धाडदिशी पडला. त्याबरोबर फॅटीने झाडावरून धपदिशी त्याच्या पाठीवर उडी मारली आणि हि-याने त्याच्या डोक्यावर लाकडाच्या तुकड्याने एक प्रहार केला.

एवढे झाल्यावर खरे म्हणजे कोणीही मनुष्य नेस्तनाबूत व्हायचा. पण त्या माणसाची ताकद एवढी होती की तो उसळी घेऊन उभा राहिला. पण तेवढ्यात विमान जोरात घरघराट करीत डोक्यावरून गेले आणि त्यातून काहीतरी जड वस्तू त्या माणसाच्या नेमकी डोक्यात पडली. त्यासरशी तो मनुष्य खाली कोसळला आणि बेशुद्ध झाला.

त्याबरोबर पक्याच्या गँगने त्याचे हातपाय घट्ट बांधून टाकले आणि त्याच्या तोंडात फॅटीच्या रुमालाचा बोळा कोंबला. इतके झाले तरी हि-याचा राग गेला नव्हता त्याने त्या माणसाच्या डोक्यात आणखी एकदा आपल्या हातातले लाकूड मारले.

पक्याने त्याला आवरले आणि त्या माणसाच्या डोक्यावर काय पडले ते तो टॉर्चच्या प्रकाशात शोधू लागला.

लौकरच ती वस्तू त्याच्या हाताला लागली. ते एक जाकीट होते, पण ते भलतेच जड लागत होते. त्यात काय असावे, याचा विचार करीत पक्या जरा उभा राहिला; तेवढ्यात

भिकूशेट ओरडले, ' अरे, पकडा, पकडा, ' आणि एकदम टॉर्च पेटवून त्या पोरांच्या अंगावर धावले.

विमानातून काय पडते इकडे त्या दोघांचे लक्ष असावे आणि एक वस्तू त्या बाजूला पडल्याचेही त्यांना दिसले असावे. म्हणून ती शोधत ते दोघे त्या बाजूला आले असावेत. शिवाय पक्याचा पेटवलेला टॉर्च आणि पडलेले ते जाकीट त्यांच्या दृष्टीला पडले असावे.

भिकूशेटनं एकदम पक्यावर झडप घातली तेवढ्यात मागून तो गोरा मनुष्यही ओरडला, ' टाक ती वस्तू; नाहीतर मी गोळी झाडेन. '

पक्या भिकूशेटच्या हातातून निसटला होता. पण त्या माणसाच्या हातातले रिव्हॉल्व्हर पाहून त्याने एकदम लोळण घेतली आणि तो एका बाजूला झाला. त्याच वेळेला त्या गोऱ्याने गोळी झाडली. ती पक्याला लागण्याऐवजी भिकू-शेटच्या पायाला लागली आणि ते मोठ्याने ओरडून खाली कोसळले.

पक्या ओरडला, ' लपा, लपा, झाडाच्या आड लपा. '

तेवढ्यात समुद्रात काहीतरी आरडाओरडा झाला. हिऱ्या ओरडला, ' आले, आले, आपले लोक आले. '

तेव्हा पुढे धावत येणारा तो गोरा मनुष्य थबकला आणि त्या पोरांच्या दिशेने एक गोळी झाडून मागे गेला.

पक्या म्हणाला, ' चला, चला. आपण त्याची होडी घेऊन जाऊ या. '

गँग धावायला लागली. पण त्या गोऱ्या माणसाने आणखी एक गोळी झाडली तेव्हा ते सगळे थबकले आणि झाडाआड

लपले.

तेवढ्यात तो गोरा माणूस पाठीवर भली मोठी पिशवी घेऊन आपल्या होडीजवळ गेला. पक्याच्या गँगच्या दिशेने त्याने आणखी एक गोळी झाडली आणि मग आपल्या होडीचे इंजिन सुरू करून तो वेगाने किनाऱ्याकडे निघून गेला.

आपल्या हातातली शिकार निसटली म्हणून पक्या खूप चिडला. तो आपल्या गँगला म्हणाला, 'तुम्ही सगळे इडियट आहात.'

आपल्या हातातला रुमाल त्याने चावून फाडून टाकला. पण मग त्याचे डोके शांत झाले आणि फॅटीच्या व कास-बॉयच्या पाठीवर दोन्ही हातांनी थाप मारून तो मोठ्याने हसत म्हणाला, 'तुम्ही नाही हां; साला मीच इडियट आहे. चला, आपण या जाकिटात काय आहे ते तरी पाहू या.'

त्याने खिशातला चाकू काढला आणि त्या जाकिटाचा एक कोपरा फाडला. तेव्हा आतून एक पिवळे चकाकते बिस्कीट बाहेर आले.

'आयला, सोनं! आता आलं लक्षात. सोन्याच्या स्मग-लिंगची भानगड आहे ही. त्या साल्याला पकडलंच पाहिजे. त्याचा जीपचा नंबर तरी निदान आहे आमच्याकडे.' पक्याने आपले डोके करकरा खाजवले.

तेवढ्यात गावातील दहा माणसे दोन होड्यांतून तेथे येऊन पोहोचली. त्यांना सगळे समजावून सांगायला, आणि मग भिकूशेट आणि तो अजस्त्र माणूस यांच्या जखमा बांधून त्यांना होड्यात घालायला बराच वेळ लागला.

सगळे लोक पक्याच्या गँगची पाठ थोपटत होते. हिऱ्या

वीरश्रीने त्यांना सगळी हकिकत होता आणि होड्या जोर-जोराने वल्हवल्या जात होत्या.

तेवढ्यात पक्या एकदम ओरडला, ‘ अरे, पण बिट्टू कोठे आहे ?’

‘ तो किनाऱ्यावरच थांबला आहे. म्हणाला, ‘ मला इथे काम आहे. ’ आम्ही म्हटलं, ‘ तुझ्याबरोबर कोणी देऊ का ?’ तर म्हणाला, ‘ नको. ’ आणि मग एकटाच आपल्या त्या काळ्या कुत्र्याला घेऊन कुठे तरी गेला. ’ हे दोघे तिघे एकदमच बोलले.

ते ऐकून पक्या ओरडला, ‘ अरे बापरे ! म्हणजे त्या गुहेत गेला असणार. चला, चला त्या गोऱ्या माणसानं त्याला गोळी-बिळी घातली असेल. ’

वल्ही मारणाऱ्यांनी आणखीनच घाई केली. तरीदेखील किनाऱ्यावर पोहोचायला बराच वेळ लागला. किनाऱ्यावर उतरल्यावर पक्या आणि त्याची गँग त्या गुहेकडे धावली. त्यांच्या मागोमाग बाकीचे लोकही धावले.

पक्याची गँग गुहेजवळ पोहचली; तेव्हा बिट्ट गुहेच्या तोंडाजवळ पडला होता आणि आणि त्याच्या पायातून रक्त वाहात होते. त्याने जखमेवर रुमाल बांधला होता, तरी रक्त वाहतच होते.

पक्या ओरडला, ‘ तो गोरा माणूस पळाला ना ?’

बिट्टूने त्या अवस्थेतही हसून मान हलवली आणि गुहे-कडे बोट दाखवले. सगळे आत धावले तेव्हा त्यांना तो गोरा माणूस जमिनीवर बेशुद्ध पडलेला आढळला आणि खंड्या कुत्रा त्याच्या छातीवर पंजा ठेवून गुरगुरत होता.

पक्या धावत बाहेर येऊन बिट्टूला म्हणाला, ‘काय झालं रे?’

‘अरे, नको त्याला त्रास देऊस.’ मोठी माणसे ओरडली आणि त्याची जखम बांधू लागली.

पण त्याही अवस्थेत खोल गेलेल्या आवाजात बिट्टू म्हणाला,

‘मी त्याच्या जीपच्या चाकातली हवा काढत होतो. तेवढ्यात तो आला आणि त्यानं गोळी झाडली. ती मला लागली आणि मी पडलो. पण तेवढ्यात खंड्यानं त्याच्या अंगावर झेप घेतली आणि त्याची मनगूट पकडली. तेव्हा तो खाली कोसळला. मग मी माझ्याजवळचा स्पॅनर त्याच्या डोक्यात मारला.’

‘ग्रेट! वंडरफुल! बिट्टच्या लेकी, खरी शिकार तूच केलीस.’ फॅटी ओरडला.

बिट्टू हसला आणि त्याने खंड्याकडे बोट दाखवले.

आणि मग खंड्यानेदेखील मोठमोठ्याने भुंकून आपल्या मर्दुमकीची हकिकत सगळ्यांना सांगितली.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
ना. क्र. 9822 दिनांक 12/1/99
विषय बा. वा. क्र. ..........
IRBK-0101922

 IRBK-0101922